महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com www.facebook.com/maharashtra.c.times Info@maharashtracrimetimes.com Twitter- @MHCrimeTimes Whatsapp -9803386748

मूल्य ३/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: १७ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार २७ जुलै २०२१ ते सोमवार २ ऑगस्ट २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

# कोकणासह पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा आढावा घेऊन आर्थिक मदतीबाबत घोषणा करणार -मुख्यमंत्री

**रत्नागिरी (योगेश होळंब): केवळ सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी मी लगेच काहीतरी घोषणा करणार नाही, राज्यातील पूर परिस्थितीचा सर्वंकष आढावा घेऊनच नुकसानभरपाई संदर्भात मदत जाहीर करण्याचा निर्णय घेतला जाईल, असे राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना चिपळूण येथे सांगितले. वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा विचार करून जिल्ह्याच्या स्तरावर याबाबत यंत्रणा उभारण्यात येईल असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी जाहीर केले.**

मुख्यमंत्री काल चिपळूण दौऱ्यावर आले होते. त्यांनी चिपळूण शहरात व्यापारी तसेच नागरिकांशी संवाद साधला. आपल्या या भेटीदरम्यान त्यांनी बाजारपेठेत झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यानंतर झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी प्रशासनाकडून झालेल्या आतापर्यंतच्या बचाव व मदत कार्य याबाबत माहिती जाणून घेतली त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

यावेळी पालकमंत्री ॲड अनिल परब, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, जिल्हा परिषद अध्यक्ष विक्रांत जाधव, खासदार विनायक राऊत, आमदार सर्वश्री भास्कर जाधव, राजन साळवी, शेखर निकम, मुख्य सचिव सिताराम कुंटे, माजी मंत्री रविंद्र माने, विभागीय आयुक्त विलास पाटील, जिल्हाधिकारी डॉ.बी.एन. पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक मोहितकुमार गर्ग, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इंदुराणी जाखड आदी उपस्थित होते.

उद्या पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्यावर जाऊन तेथील परिस्थितीची पाहणी करणार आहे. त्यानंतर दोन ते तीन दिवसात आर्थिक नुकसानीचा आढावा घेतला जाईल. दरम्यानच्या काळात तातडीची मदत म्हणून अन्न तसेच औषध कपडेलत्ते व इतर



अत्यावश्यक बाबी पुरवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत असे मुख्यमंत्री म्हणाले. मदत पुरवताना कोणत्याही तांत्रिक मुद्द्यांवर अडचणी येऊ नये यासंदर्भात प्रशासनाला सूचना केल्या आहेत असेही ते म्हणाले. केंद्र सरकारकडून आपल्याला व्यवस्थित मदत मिळत आहे. माझे पंतप्रधान तसेच गृहमंत्री आणि संरक्षण मंत्री यांच्याशी बोलणे झाले आहे. एनडीआरएफ, लष्कर तसेच हवाई दल यांच्या तुकड्या राज्य सरकारला पूर परिस्थितीत मदत करत आहेत, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, केंद्राकडून आर्थिक मदतीबाबत पूर्ण आढावा घेतल्यानंतरच मागणी केली जाणार आहे.

## थोडक्यात

### सोलापुरात आमदार पुत्रांच्या लग्नाला हजारोंची गर्दी, गुन्हा मात्र एकट्या आयोजकावर

**सोलापूर (अलीहूसेन शेख):** राज्यात कोरोनाची दुसरी लाट अद्याप ही पूर्णपणे ओसरलेली नाहीये. अशात तिसऱ्या लाटेची शक्यता देखील तज्ञांकडून व्यक्त होतेय. त्यामुळे राज्यात अद्याप ही निर्बंध कायम आहेत. सोलापूर जिल्ह्यात देखील संध्याकाळी चार नंतर सर्व व्यवहार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेत. तर शनिवार- रविवारी



तर संपूर्ण दिवस लॉकडाऊन प्रशासनाच्यावतीने लॉकडाऊन जाहीर करण्यात आला आहे. मात्र या सगळ्या नियमांना खुद्द लोकप्रतिनिधीची हरताळ फासत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. बार्शी विधानसभेचे आमदार राजेंद्र राऊत यांच्या दोन्ही मुलांचे लग्न काल बार्शीत पार पडले. लक्ष्मी सोपान बाजार समितीचे चेअरमन आमदार राजेंद्र राऊत यांचे सुपुत्र रणजित राऊत यांचा तसेच त्यांचे बंधू रणवीर राऊत यांचा विवाह सोहळा काल संध्याकाळी ६.४५ मि. गोरज मुहुर्तावर पार पडला. अंत्यत थाटामाटात झालेल्या या विवाह सोहळ्यासाठी हजरोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते. अनेकांच्या चेहऱ्यावर मास्क नव्हते. सोशल डिस्टन्सचा पुरता फज्जा या लग्न सोहळ्यात उडालेला होता.

### मुख्यमंत्री राज्यावरील पुराचे संकट, कोरोना पार्श्वभूमीवर साजरा करणार नाहीत वाढदिवस

**मुंबई (विशाल पाटील):** कोकण, पश्चिम महाराष्ट्रावर निसर्ग कोपला असून पुरामुळे मृत्यू झाले आहेत, अनेकांच्या कुटुंबियांवर आघात झाला आहे. या आपत्तीत महाराष्ट्र शोकाकुल असून कुणीही



माझा वाढदिवस साजरा करू नये असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले आहे. २७ जुलै रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस असला तरी या आपत्तींमुळे तो साजरा न करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. वाढदिवसानिमित्त कुणीही अभिष्टचिंतन करण्यासाठी प्रत्यक्ष भेटू नये तसेच फलक, पोस्टर्स लावू नये, सोशल मीडिया व ईमेलच्या माध्यमातून आपण शुभेच्छा स्वीकारू, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. राज्यात अद्याप कोरोनाचे संकट कायम आहे, संभाव्य तिसऱ्या लाटेची शक्यता वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे, त्यामुळे आरोग्याचे नियम कटाक्षाने पाळत राहणे गरजेचे आहे, त्यामुळे वाढदिवसाचे कुठलेही जाहीर कार्यक्रम करू नयेत अशी विनंतीही मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

## तळीये गावाच्या पुर्नविकासाचा मार्ग मोकळा; रायगड ट्रस्टची चार एकर जागा देणार!

**रायगड (राकेश गायकवाड)-** दुर्घटनाग्रस्त रायगड जिल्ह्यातील महाडमधील दुर्घटनाग्रस्त तळीये गावाच्या पुर्नविकासाचा मार्ग आता मोकळा झाला आहे, कारण रायगड ट्रस्टच्यावतीने या गावच्या पुर्नविकासासाठी चार



एकर जमीन दिली जाणार आहे. शिवाय, या संदर्भात महाडाने तातडीच्या बैठकीचे देखील आयोजन करण्यात आले असून, म्हाडाचे अधिकारी व मंत्री तळीये गावात जाऊन पाहणी करणार असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, छत्रपती संभाजीराजे यांनी आज राज्याचे गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांना या संदर्भात फोन केल्याची देखील माहिती समोर आली आहे. त्यानंतर आता रायगड ट्रस्टची चार एकर जागा तळीये गावाच्या पुनर्विकासासाठी देण्यात आली आहे. या अगोदरच तळीये गावाच्या पुनर्विकासाची जबाबदारी म्हाडाने घेतलेली आहे, अशी घोषणा जितेंद्र आव्हाड यांनी केलेली आहे. त्यानंतर आता पुनर्विकसाच्या नियोजनासंदर्भात बैठक बोलावण्यात आलेली आहे. अशी माहिती एबीपी माझाने दिली आहे.

## साताऱ्यातील खराब वातावरणामुळे मुख्यमंत्री फिरले माघारी; सातारा आणि कोयनानगरमध्ये जोरदार पाऊस

**मुंबई (विशाल पाटील)-** राज्यात मुसळधार पावसामुळे महापुराचा तडाखा बसलेल्या पश्चिम महाराष्ट्राचा दौरा आज मुख्यमंत्र्यांनी आयोजित केला होता. दरम्यान, ते सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील पूर परिस्थितीची पाहणी करणार होते. परंतु, सातारा आणि कोयनानगरमध्ये मुसळधार पाऊस सुर असल्याने हवामान खराब आहे. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच हेलिकॉप्टर कोयनानगरातील हेलिपॅडवर लँड होऊ शकले नाही. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांचा सातारा जिल्ह्यातील दौरा रद्द करण्यात आला आहे. ते आता आपल्या



हेलिकॉप्टरने पुण्याकडे रवाना झाले असल्याचे सांगण्यात येत आहे. राज्यात गेल्या काही दिवसापासून मुसळधार पाऊस सुरु आहे. सातारा आणि कोयनानगरमध्ये सध्याही जोरदार पाऊस सुरु आहे. त्यामुळे वातावरण खराब झालेले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आज सकाळी ११ च्या सुमारास पुण्याहून कोयनानगरकडे रवाना झाले होते. ते साडे अकरा वाजेच्या सुमारास कोयनानगरातील हेलिपॅडवर पोहचणार होते. परंतु, वातावरण खराब असल्याने त्यांचा हेलिकॉप्टर लँड होऊ शकले नाही. त्यामुळे ते परत त्याच हेलिकॉप्टरने पुण्याकडे रवाना झाले आहे.

## मुंबईचा एप्रिलपर्यंतच्या पाण्याचा प्रश्न मिटला; तलाव क्षेत्रात धुवांधार, दोन वर्षांचा रेकॉर्ड ब्रेक

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** मुंबईला मोडक सागर, तानसा, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा, तुळशी, विहार व भातसा अशा सात तलावांतून दररोज ३८०० दशलक्ष लिटर पाणी पुरवठा केला जातो. पालिका वर्षभराच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी १ ऑक्टोबर



रोजी उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेतला जातो. यावेळी १४४७३६३ दशलक्ष लिटर पाणी असणे आवश्यक असते. त्यामुळे मान्सूनच्या सुरुवातीपासूनच तलाव क्षेत्रात समाधानकारक पाऊस होणे मुंबईकरांसाठी आवश्यक असते.

मात्र या वर्षी जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पावसाने तलावक्षेत्राला ओढ दिल्याने केवळ १८ टक्के पाणी शिलूक होते. त्यामुळे पालिकेने पाणीकपातीचे संकेतही दिले होते. मात्र गेल्या दहा दिवसांपासून तलावक्षेत्रात होणाऱ्या जोरदार पावसामुळे समाधानकारक पाणीसाठा जमा झाला आहे.

## येत्या दोन दिवसांत पूरग्रस्तांना मदत देण्यासंदर्भात अंतिम निर्णय घेणार : अजित पवार

**सांगली (गणेश बागडे)-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सांगलीतील पूरग्रस्त



भागाचा दौरा केला. या दौऱ्यानंतर त्यांना माध्यमांशी संवाद साधला. शेतकरी व्यापारी यांच्या वेगवेगळ्या मागण्या आहेत. त्या मागण्या ऐकून घेतल्या आहेत. पुरामुळे आणि अतिवृष्टीमुळे अडचणीतल सापडलेल्यांना नक्कीच मदतीचा हात दिला जाईल. मुख्यमंत्री सर्व परिस्थितीचा आढावा घेत आहे आणि केंद्राला देखील याबाबत माहिती दिली जाईल असं अजित पवार यांनी म्हटलं.

राज्यातील ९ जिल्ह्यामध्ये पुरामुळे मोठं नुकसान झालं आहे. सर्व नुकसांनीची माहिती घेतली जात आहे. नुकसानग्रस्त भागातील पंचनामे अद्याप पूर्ण झाले नाहीत. मात्र येत्या दोन दिवसांत पूरग्रस्तांना मदत देण्यासंदर्भात अंतिम निर्णय घेणार असल्याची घोषणा अजित पवार यांनी केली. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे आमदार, खासदार एक महिन्याचे वेतन देणार आहेत, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

## 'पॉर्न ॲप्स आणि वेबसाईटची टास्क फोर्सतर्फे झाडाझडती करा': भाजप नेत्याची अमित शहांकडे मागणी



**मुंबई (जसबीरकौर भामरा): 'नुकत्याच झालेल्या राज कुंद्रा पोर्नोग्राफी प्रकरणानंतर मुंबई पोलिसांच्या तपासात अश्लील साईट आणि उद्योगातील गुन्हेगारांकडून तरुणींचे शोषण व प्रचंड आर्थिक फसवणुकीची अनेक धक्कादायक माहिती उघड होत आहे. त्यामुळे या प्रकरणी संयुक्त टास्क फोर्स नियुक्त करुन अधिक झाडाझडती करण्यात यावी,' अशी मागणी भाजपा नेते आमदार ॲड आशिष शेलार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे केली आहे.**

केंद्रीय गृहमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात आमदार आशिष शेलार यांनी म्हटलं आहे की, 'राज कुंद्रा याच्या कंपनीतर्फे चालवले जाणारे १ अश्लील ॲप सबस्क्राइब रेव्हेन्यू म्हणून दरमहा २० कोटींपेक्षा जास्त उत्पन्न कमवत आहे, असा आरोप करण्यात येतो आहे. होतकरू तरुण तरुणींचे शोषण करून दबाव आणून हे व्हिडिओ तयार केले गेले होते. अशा ४० हून अधिक बेकायदेशीर अश्लील ॲप्स आणि वेबसाइट्स सदस्यत्वातून शेकडो कोटींची कमाई करतात. या सगळ्यातून तरुण पिढीवर, किशोरवयीन मुलांवर विपरीत परिणाम होत असून नकारात्मकतेने घेरले आहे. चाइल्ड पॉर्नमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे ही दिसून येत आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत २०१९ पासून १५ हजार पेक्षा जास्त बाल अश्लील क्लिप अपलोड केल्या गेल्या आणि २१३ एफआयआर नोंदविण्यात आल्याची माहिती समोर येते आहे. सन २०१७ पासून २०१९ पर्यंत पॉस्को प्रकरणात ४५ टक्के वाढ झाली आहे. ही अत्यंत बाब चिंताजनक आहे.'

## अखेर पाच दिवसानंतर तळीयेतील रेस्क्यू ऑपरेशन थांबवलं; बेपत्ता नागरिकांना मृत घोषित करण्याची मागणी

**महाड (नितीन देवळेकर):** पाच दिवसानंतर अखेर महाडच्या तळीयेतील रेस्क्यू ऑपरेशन थांबवण्यात आलं आहे. मात्र, या दुर्घटनेत जेवढे लोक बेपत्ता झालेत त्या सर्वांना मृत घोषित करा, अशी मागणी तळीयेच्या ग्रामस्थांनी केली आहे. त्यामुळे राज्य सरकार काय निर्णय घेते याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. गेल्या पाच दिवसांपासून तळीये येथे दरडीचा ढिगारा उपसण्याचं आणि बेपत्ता नागरिकांना शोधण्याचं काम सुरू होतं. त्यासाठी या ठिकाणी एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि टीडीआरएफची पथकं गेल्या पाच दिवसापासून रेस्क्यू ऑपरेशन करत होती. आजही या पथकांनी घटनास्थळी येऊन रेस्क्यू ऑपरेशन सुरू केलं. मात्र, त्यानंतर दोन तासाने रेस्क्यू ऑपरेशन थांबवण्यात आलं. या पथकांनी रेस्क्यू ऑपरेशन



थांबवल्यानंतर स्थानिकांनी त्यांना गराडा घातला. तुम्ही रेस्क्यू ऑपरेशन थांबवा. त्याबद्दल आमचा आक्षेप नाही. मात्र, जे लोक बेपत्ता आहेत. त्यांना मृत घोषित करा, अशी मागणी या नागरिकांनी केली. तसेच आमच्या पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावा, त्याशिवाय आम्हाला लागणाऱ्या दैनंदिन वस्तूंचा पुरवठा करण्यात यावा, अशी मागणी या ग्रामस्थांनी केली आहे. पाच दिवसापूर्वी तळीये येथे डोंगराचा कडा कोसळून झालेल्या दुर्घटनेत ३५ घरे जमीनदोस्त झाली होती. या दरडीखाली दबलेले ३२ मृतदेह काढण्यात बचाव पथकाला यश आलं होतं. मात्र, त्यानंतर एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि टीडीआरएफच्या टीमने रेस्क्यू ऑपरेशन हाती घेऊन कालपर्यंत ५३ मृतदेह बाहेर काढले. मात्र, अजूनही ३२ नागरिक बेपत्ता आहेत. डोंगराच्या दरडीबरोबर दोन ते चार किलोमीटरपर्यंत हे नागरिक घरंगळत गेले असावेत असं सांगितलं जातं. त्यामुळे या संपूर्ण दोनचार किलोमीटरच्या परिसरातही शोधाशोध करण्यात आली. यावेळी पाऊस जास्त असल्याने रेस्क्यू ऑपरेशनमध्ये अडथळा येत होता. तसेच सर्वत्र चिखल झाल्याने त्यातून मार्ग काढत जाणंही कठिण होत होतं.

गेल्या आठवड्याभरापासून महाडमध्ये सुरू असलेल्या पावसामुळे दाणादाण उडाली आहे. गुरुवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास महाडच्या तळीये गावात दरड कोसळण्याची दुर्घटना घडली. महाड तालुक्यातील तळीये गाव हे डोंगर कपारीमध्ये वसलेले आहे.

## दरडीखाली दबून १६ जणांचा मृत्यू; १ चिमुरडा अद्याप बेपत्ता

**खेड (अमोल गुडेकर):** कोकणात अतिवृष्टिमुळे हाहाकार माजवला आहे. सर्वाधिक फटका रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण व खेड तालुक्याला बसला आहे. खेड तालुक्यात पोसरे बौद्धवाडीतील ७ कुटुंबातील १७ ग्रामस्थ आणि २४ जनावरे तर बिरमणी येथे घरावर दरडी कोसळल्याने २ असे एकूण १९ जण अडकले होते. रविवारी सायंकाळी उशिरापर्यंत पोसरे येथे दरडीखाली अडकलेल्या १६जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत तर एक लहान मुलगा अद्याप बेपत्ता आहे. बिरमणी येथील घटनेत दोन मृतदेह दरडीखालुन रविवारी २५ जुलै रोजी काढण्यात आले



आहेत. दरड हटविण्याचे काम सोमवारीही सुरु आहे. या दुर्घटनेतील ७ जखमींवर खेड कळंबणी उपजिल्हारुग्णालयात उपचार सुरू आहेत. अशी माहिती खेड तालुका प्रशासनाकडून देण्यात आली आहे. एनडीआरएफ व लष्कराच्या बचाव पथकाने स्थानिकांच्या मदतीने येथील मदतकार्य युद्धपातळीवर सुरु आहे. रविवारी सायंकाळी उशिरापर्यंत पोसरे बौद्धवाडी येथे ८ जणांचे मृतदेह मिळाले. शनिवारी ४ तर रविवारी दुपार पर्यंत ४ मृतदेह मिळाले होते. आतापर्यंत दोन्ही घटनेत तब्बल १८ जणांचे मृतदेह मिळाले आहेत. आतापर्यंत सापडलेल्या मृतदेहांमध्ये पुढील १८ जणांचा समावेश आहे.

## परराज्यांतील पोलिसांचा मार्ग सुकर; कारवाईसाठी मुख्यालयातून परवानगी घेण्याची गरज नाही

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** मुंबई पोलिस सहकार्य करीत नाहीत, अशी देशभरातील पोलिस दलांची तक्रार आता दूर केली जाणार आहे. कोणत्याही कारवाईसाठी अथवा आरोपीला पकडण्यासाठी मुंबईत आलेल्या इतर राज्यांतील पोलिसांना मुख्यालयातून परवानगी घ्यावी लागत होती. यामुळे आरोपी सतर्क होत असे आणि ही प्रक्रिया देखील वेळखाऊ होती. मुंबईचे पोलिस आयुक्त हेमंत नगराळे यांनी ही प्रक्रियाच रद्द करून स्थानिक पोलिसांना मदत आणि परवानगीचे अधिकार दिले आहेत. भादंवि तसेच सीआरपीसीनुसार देशात कुठेही जाऊन आरोपीला पकडणे हा



पोलिसांचा अधिकार आहे; मात्र ही कारवाई करताना स्थानिक पोलिसांना सूचित करणे अनिवार्य आहे. असे असताना गेल्या काही वर्षांपासून मुंबईत कारवाईसाठी येणाऱ्या पोलिसांना मुंबई पोलिस आयुक्त कार्यालयात जाऊन गुन्हे शाखेच्या पोलिस उपायुक्तांकडून त्यासाठी परवानगी घ्यावी लागत होती. अगदी मुंबईच्या टोकाच्या दहिसरमध्ये कारवाईसाठी या पोलिसांना क्रॉफर्ड मार्केटजवळील मुख्यालय गाठावे लागायचे. ही परवानगी मिळाल्यानंतर स्थानिक पोलिस ठाण्यात माहिती देऊनच पुढील कारवाईला परवानगी मिळत होती. या प्रक्रियेमुळे वेळ तर वाया जायचाच, पण त्याचबरोबर आरोपीलाही कुणकुण लागायची. असे प्रकार घडू नयेत तसेच देशाच्या इतर राज्यांतील पोलिसांच्या मनातील मुंबई पोलिसांची असहकार्याची प्रतिमा पुसली जावी यासाठी आयुक्त नगराळे यांनी आयुक्तालयातून परवानगी देण्याची प्रक्रियाच रद्द केली आहे. परराज्यातून आलेले पोलिस कारवाईच्या परवानगीसाठी अथवा मदतीसाठी थेट स्थानिक पोलिस ठाण्यात जाऊ शकतात, असे आयुक्तांनी आपल्या आदेशात म्हटले आहे.



संपादक:- राकेश शंकर गोरे

# फाटलेले आभाळ अन् जाणारे जीव!

महाराष्ट्राच्या गाववस्त्यात अतिवृष्टी मरणाची कफन लेवून थैमान घालते आहे. तापमानवाढीमुळे पावसाचा पॅटर्न गेल्या काही वर्षांत पुरता बदललाय. काही तासांत काही दिवसांचा पाऊस धबाधबा कोसळतोय. महाराष्ट्रात नगरनियोजनाची वाट लागलेली आहे, तिथे गावखेड्यांचे काय? पुण्यासारख्या संपन्न टापूतले माळीण गाव काही वर्षांपूर्वी पावसाळ्यात डोंगराखाली गाडले गेले. तथापि प्रगत, पुरोगामी महाराष्ट्राने त्यातून धडा घेतलाच नाही. खरे तर अशा धोकादायक गावांची यादी करून ती अन्यत्र हलवायला हवी होती. मरणाच्या सावलीत न जगता जीवनाचे लढे सुरक्षित होऊन द्या, असे गोरगरिबांना मायबाप सरकारने समजावून सांगणे आवश्यक होते. पण या कामातून टक्केवारी नाही, त्यामुळे गुंठेवारी नोंदवणे, पट्टे करणे या कामात रस घेणारी महसुली यंत्रणा समाजहिताचे काहीच मनावर घेत नाही. गरिबाच्या जगण्याला त्यांच्या लेखी बहुधा मोल नसतेच! त्यामुळे माळीणची पुनरावृत्ती झाली.

**जगणे महाग, मृत्यू स्वस्त**

राज्यातल्या मुंबईजवळील रायगड, सातारा जिल्ह्याच्या पश्चिम पट्ट्यात, मुंबईच्या डोंगर टेकड्यांखालील झोपड्यात एकुणात शंभरच्या आसपास मृत्यू नोंदवले गेले. ज्या डोंगरांच्या आधाराने लोक जगायचे तेच खचले. वस्त्या चिरनिद्रा घेत्या झाल्या. आंतरराष्ट्रीय दर्जाचे महानगर असलेल्या मुंबईत हे दरवर्षी होते. डोंगर भुसभुशीत होऊन दरडी कोसळतात, झोपड्या जमीनदोस्त होतात आणि माणसेही प्रतिवर्षीप्रमाणे मरतात. कोरोनाने काही हजार मृत्यू झाले, त्यात पावसाळी मृत्यूंची भर पडली. जगणे महाग आणि मृत्यू स्वस्त झालाय. सत्ताधाऱ्यांना, प्रशासनाला अशा मृत्यूचे महत्त्व खानेसुमारीपलीकडे असते हे कळते का? सरकारने आभाळ फाटल्यावर ठिगळ लावण्याचे आणि पंचनाम्याचे उपचार



करण्याची वेळ येण्याआधीच पुनर्वसन, स्थलांतर केले असते तर ही वेळ कदाचित आली नसती. पावसाचे आगमन 'नाही रे' वर्गासाठी चिंतांचे सावट आणते. तांडवी, माळीण गावे दरडीखाली गेली, तेव्हा बरीच कारणमीमांसा झाली. डोंगर पोखरून शेती करणे, त्याच्या खालील घरे हे सगळे धोकादायक असते. मानवी जीवन धोक्यात आल्याचे इशारे वैज्ञानिकांनी दिले. पण माळीणची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उपाययोजना केल्या काय? डोंगर, टेकड्यांखालील गावे, वस्त्या अन्यत्र हलवण्यासाठी उपाययोजना आखल्या काय? विस्थापन दु:खद खरेच, पण जगण्यासाठी अपरिहार्य असल्याचे स्थानिकांना सांगता आले असते. जगातले दरड कोसळून होणारे १८ टक्के मृत्यू भारतातले असतात. ते हिमालयातच नव्हे महाराष्ट्रातही घडतात.

फक्त लढ म्हणा...

कोकणातली परिस्थिती आणखी भीषण. पन्नास टक्के गावे डोंगरकपारीत वसलेली. गडचिरोलीच्या आदिवासी भागांचेही तसेच. तेथली गावे पाण्यात बुडाली तर दखलही घेतली जात नाही. सत्ता कुणाचीही असो... बांधिलकी जनतेशी हवी. भविष्याचा वेध घेत वर्तमानाशी सामना करणे हे ध्येय हवे. अतिवृष्टीने गेल्या वर्षी राज्यात शेतीचे नुकसान झाले. पाच हजार कोटींची तूट आली. लहरी हवामानाने कुठे खूप पाऊस, तर कुठे दुष्काळ निर्माण झाला. अस्मानी आपत्तीत मदत महत्वाची असते. पश्चिम घाटांतील बेसुमार जंगलतोडीमुळे अपरिमित नुकसान होत असल्याचे माधव गाडगीळ समितीने सांगितले आहे. त्यातले तथ्य शोधून उपाययोजना कराव्या लागतील. कृष्णेचे पाणी सांगलीत, तर पंचगंगेचे कोल्हापुरात थैमान घालते. अर्थव्यवस्थेची हानी होते, जगण्याचा प्रश्न उभा राहतो. केंद्र मदत करेल. बोटी, हेलिकॉप्टरद्वारे प्राण वाचवतील. पण 'फक्त लढ म्हणा' हे सांगण्यासाठी नेतृत्व गरजेचे असते.

यंत्रणा गतिमान करावी

दरवर्षी भिजून ठप्प पडणाऱ्या मुंबईत नेतृत्व जाणवले नाही. आता राज्यात कस लागणार आहे. तौक्ते वादळाने रायगडला झोडपले. छपरे उडाली, संसार उघडे पडले. ना शेतीला मदत मिळाली, ना मासेमारांना. रायगडला पुन्हा निसर्गाने चपराक दिली आहे. शिवसेनेचा प्राण मुंबई, कोकणात वास करतो. हा सगळा परिसर नव्या निसर्गरचनेचा बळी ठरणार काय? असा प्रश्न आहे. या परिसरात तेलशुद्धीकरण प्रकल्प नको, उर्जा प्रकल्प नको, असे शिवसेनेला वाटते. शाश्वत विकासवाटांसाठी आव्हानाला अनुकूल पर्यावरणीय बदल करावे लागतील. जनतेला दिलासा द्यावा लागेल. सांगलीतल्या पुराच्या वेळी फडणवीस सरकारने मदतकार्याला दिरंगाई केल्याने जागा गेल्या. जनता हिशेब चोख ठेवत असते. म्हणून उद्धव ठाकरेंनी जनतेला सर्वार्थाने मदतीसाठी यंत्रणा गतिमान केली पाहिजे.

# उंची मर्यादेमुळे रखडलेले गृहप्रकल्प मार्गी लागणार

**नवी मुंबई (धनश्री सट्टा)-** नैना क्षेत्रात विमान प्राधिकरणाने इमारती उंचीची मर्यादा घातल्याने अनेक गृहप्रकल्प रखडले आहेत. त्यामुळे महामुंबई क्षेत्रात ज्या बांधकामांना विमान प्राधिकरणाने उंचीबद्दल 'ना हरकत' प्रमाणपत्र दिले आहे, त्या बांधकामांना सिडको आता बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र देणार आहे. त्यामुळे इमारत उंची



मर्यादेमुळे रखडलेले गृहप्रकल्प मार्गी लागणार आहेत.

'नैना' क्षेत्रात अगोदर ९६० हेक्टर जमिनीचा समावेश करण्यात आला होता पण ती मर्यादा कमी करून आता हे क्षेत्र ६०० पर्यंत आहे. या संपूर्ण क्षेत्रातील नवीन बांधकामाला सिडकोची परवानगी अनिवार्य आहे. विमानतळ उड्डाण आणि उतरणे या भागातील इमारत उंचीला केंद्रीय विमान प्राधिकरणाने काही मर्यादा घातलेल्या आहेत. विमानतळाच्या जवळ असलेल्या इमारतींना अतिशय कमी तर विमानतळापासून दूर असलेल्या इमारतींना जास्त उंची मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे विमानतळ प्राधिकरणाची उंची मर्यादा स्पष्ट करणारे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय विकासकांना बांधकाम परवानगी दिली जात नाही. विमानतळ प्राधिकरणाने या अगोदर घातलेली उंचीमर्यादा काही ठिकाणी आता शिथिल केली आहे. त्यामुळे विकासकांना विमानतळ प्रधिकरण 'ना हरकत' प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी, विमानतळ प्राधिकरणाचे काही उच्च अधिकारी व विमानतळ उभारणाऱ्या नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड या कंपनीच्या अधिकारी बैठकीत नवी मुंबई व नैना क्षेत्रातील बांधकाम व्यावसायिकांना अडथळा ठरणारी ही उंचीमर्यादा कमी करण्याबाबत अनेक बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामुळे भारततीय विमानतळ प्राधिकरणांचे उंची स्पष्ट करणारे ना हरकत प्रमाणपत्र असणाऱ्या विकासकांना तात्काळ बांधकाम परवानगी व ज्यांचे प्रकल्प या ना हरकत प्रमाणपत्रमुळे रखडले आहेत.



# बेकायदा चाळीमुळे कल्याण-डोंबिवली जलमय

**कल्याण (आकाश कांबळे)- कल्याण-डोंबिवली, टिटवाळा शहरांभोवतीच्या नदी तसेच खाडीकिनारा परीघ क्षेत्रात गेल्या दहा वर्षांत खारफुटी, नैसर्गिक नाले, पावसाचे पाणी व्हाळ बुजवून मोठ्या संख्येने बेकायदा चाळी माफियांनी उभारल्या आहेत. या चाळींमध्ये नदी तसेच खाडीचे पाणी शिरू नये म्हणून चाळींच्या उभारणी करण्यापूर्वी खाडीच्या भूपृष्ठ पातळीपासून १५ ते २० फूट उंचीचा दगड, मातीचा भराव केला जातो. यामुळे खाडीचे पात्र अरुंद होण्याबरोबरच नाले, गटारे आणि नैसर्गिक व्हाळाच्या मार्गात अडथळे निर्माण होऊन भरतीच्या वेळेस पावसाचे पाणी तुंबून शहरे जलमय होत असल्याची माहिती डोंबिवलीतील ज्येष्ठ नियोजनकार, ज्येष्ठ वास्तुविशारदांनी दिली.**

खाडीकिनारालगतची जागा महाराष्ट्र सागरी मंडळ, सरकारी तसेच वनविभागाची आहे. काही ठिकाणी पालिकेचे आरक्षित भूखंड आहेत. या भूखंडावर सरकारी यंत्रणेचे लक्ष नाही. त्यामुळे खाडीकिनारची खारफुटी, झाडे-झुडपे तोडून भूमाफिया बेकायदा चाळी उभारतात. या बांधकामातून झटपट पैसे मिळत असल्याने भूमाफियांकडून असे उद्योग केले जातात. या चाळीची बांधकामे करताना मातीचा तसेच दगडाचा १५ ते २० फूट उंचीचा भराव टाकण्यात येतो. त्यानंतर तिथे बेकायदा चाळींची उभारणी केली जाते. या भरावामुळे शहरातून येणारे नैसर्गिक नाले, व्हाळ, गटारांचे मार्ग काही वेळेस बुजविले जातात, तर काही वेळेस त्यांच्या मार्गात अडथळा निर्माण होतो. मुसळधार पाऊस आणि त्यातच भरती आली तर नैसर्गिक नाले, व्हाळ, गटार तुंबून शहरात पाणी साचण्यास सुरुवात होते. एक चाळ १२ खोल्यांची असते. दोन ते तीन फुटांचे अंतर सोडून या चाळी बांधल्या जातात. घरातील सांडपाणी, मलपाणी वाहून जाण्यासाठी कोणतीही व्यवस्था नसते. चाळीच्या बाहेरील जागेत या पाण्याचा निचरा होतो, अशी माहिती सूत्रांनी दिली.

डोंबिवली पश्चिमेतील ह प्रभागाच्या हद्दीत कुंभारखाणपाडा, गरिबाचापाडा, जगदंबा माता मंदिर, देवीचापाडा, मोठागाव खाडीकिनारी भागात सहा ते सात हजार बेकायदा चाळी बांधण्यात आल्या आहेत. अशीच परिस्थिती डोंबिवली पूर्वेतील ग प्रभागाच्या हद्दीत आहे. कोपर पूर्व रेल्वे स्थानकाच्या बाजूला गेल्या १० वर्षांत सीआरझेड, पालिकेचे राखीव भूखंड, सरकारी जमिनींवर, तलाव बुजवून तीन ते चार हजार चाळी उभारण्यात आल्या आहेत. शहरी भागात चाळीतील खोली तीन ते चार लाख रुपयांना विकत मिळते. खाडी भागातील बेकायदा चाळींमध्ये दीड ते दोन लाख रुपयांना प्रशस्त खोली विकत मिळते. भविष्यात या खोल्यांमध्ये पुराचे पाणी येईल किंवा अन्य आपत्ती आली तर त्याचा त्रास होईल, याचा विचार न करता रहिवासी चाळींमध्ये खोल्या खरेदी करतात. बहुतांशी घरे खरेदी करणारा वर्ग हा मुंबईतील तुर्भे, देवनार, भांडुप, मालाड, कांदिवली, विक्रोळी भागांतून झोपड्या, चाळीतील घरे विकून आला आहे. मुंबईतील चाळीतील खोली, झोपडी ३० ते ४० लाख रुपयांना विकली जाते, तर दोन लाखांत डोंबिवलीत खोली मिळते म्हणून मुंबईतील बहुतांशी वर्ग या भागात स्थलांतरित होत आहे, अशी माहिती बांधकाम क्षेत्रातील एका जाणकाराने दिली. कल्याणमध्ये वालधुनी नदी, खाडीकिनारा भागात, टिटवाळा येथे काळू नदी पात्र, कल्याण पूर्वेत मलंगगड रस्त्यावर नेवाळी, शिळफाटा रस्त्यालगत बेसुमार चाळी बांधण्याचा उद्योग सुरू आहे. गेल्या १५ वर्षांत १० हजारांहून अधिक बेकायदा चाळी उभारूनही त्यावर पालिका किंवा सरकारी यंत्रणेने कारवाई केली नाही.

# 'मेट्रो' डब्यांची जोडणी आणखी रखडणार

**नवी मुंबई (सतिश सोनावणे)-** मेट्रोसाठी लागणारे सर्व डबे हे चीनमधून आयात करण्यात आले असून त्यांची जोडणी ही चीनमधील अभियंत्यांच्या मार्गदर्शनाखाली होणार होती. मात्र गेली दीड वर्षे करोना साथीच्या संसर्गामुळे चीनमधून भारतप्रवासाला बंदी असल्याने हे अभियंत्यांचे पथक भारतात दाखल होऊ शकलेले नाही. त्यामुळे हा प्रकल्प पूर्ण झाला तरी चीन अभियंत्यांच्या परिसस्पर्शाशिवाय सुरू होण्याची शक्यता कमी आहे.

डबे पुरवठा करणाऱ्या कंपनीच्या अभियंत्याच्या साह्याने तसेच दूरचित्र संवादाने हे काम काही प्रमाणात केले जात आहे. तरीही चीनमधील काही प्रमुख अभियंत्यांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक असल्याने त्यांना भारतात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

बेलापूर ते पेंदार या मार्गावर ११ सप्टेंबर २०१९ रोजी माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यशस्वी चाचणीदेखील करण्यात आलेली आहे. या ११ किलोमीटर मार्गासाठी एकूण २४ डबे चीनवरून अडीच वर्षांपूर्वीच आणण्यात आलेले आहेत. या २४ डब्यांच्या ८ मेट्रो तयार केल्या जाणार असून त्यांची जोडणी ही चीनमधील अभियंत्यांच्या उपस्थितीत केली जाणार होती. चीनमधील सीआरआरएस या कंपनीने हे डबे पुरविले आहेत. त्यासाठी भारतातील एका नामांकित कंपनीने मध्यस्थी केलेली आहे. या कंपनीचे काही अभियंते पहिल्या दिवसापासून या डबाजोडणीसाठी प्रयत्नशील आहेत. भारतात जानेवारी २०२० मध्ये चीनहून आलेला पहिला रुग्ण आढळून आला. त्यानंतर मार्चपासून विविध राज्यांत रुग्णसंख्या आढळून येऊ लागली. २२ मार्चला देशात टाळेबंदी जाहीर करण्यात आली. त्यानंतर चीनमधून विमानप्रवासाला बंदी घालण्यात आली. ती



आजतागायत कायम आहे. त्यामुळे चीनमधून ही मेट्रो डब्यांची टीम भारतात दाखल होऊ शकलेली नाही. त्यावर उपाय म्हणून सिडकोने चीनमधील या अभियंत्याशी दूरसंवाद (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग) साधून काही प्रमाणात हे डबाजोडणीचे काम कायम ठेवलेले आहे. तरीही चीनमधील या अभियंत्यांची उपस्थिती आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना भारतात आणण्याचे प्रयत्न उच्च पातळीवर सुरू असून सीआरआरसी त्यासाठी प्रयत्न करीत आहे. करोनाची दुसरी लाट अद्याप ओसरलेली नसताना तिसऱ्या लाटेचा इशारा जागतिक आरोग्य संघटनेने दिला गेला आहे.

# वसई-विरारमध्ये उघडी गटारे धोकादायक

**विरार (तृप्ती गोरे)-** रविवारपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने वसई-विरार परिसरात अनेक ठिकाणी पूरस्थितीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. यात पावसाने अनेक गटारावरील झाकणे वाहून गेली तर काही तुटली आहेत. ही गटारे अधिक धोकादायक बनली आहेत. पावसाआधी पालिकेने शहरातील गटारांची दुरुस्ती केल्याचे दावे पहिल्याच मुसळधार पावसाने वाहून गेले आहे. रविवारी झालेल्या पावसात अनेक गटारांची झाकणे गायब झाली आहेत. तर अनेक ठिकाणी पाण्याच्या प्रवाहाने तुटली आहेत. तर काही ठिकाणी गटारांचे चेंबर वाहून गेले आहेत. यामुळे अपघातांचा धोका निर्माण झाला असून पालिकेने ही उघडी, तुटलेली गटारे तातडीने दुरुस्त करावी अशी मागणी होत आहे.



वसई विरार शहरात दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचून वसई जलमय होत असते. शहरातील रस्त्यांना अक्षरशः तलावाचे स्वरूप येत असते. त्यामुळे रस्ता कुठला आणि गटार कुठले हा फरक कळत नाही. यातील सर्वात मोठा धोका उघड्या गटारांचा निर्माण होतो. नुकताच बिलालपाडा येथे आठ वर्षांचा मुलगा वाहून गेला आहे. अजूनही त्याचा कोणता थांगपत्ता लागला नाही. दरवर्षी या उघड्या गटारांमुळे अनेक जण अपघाताचे बळी ठरत आहेत. तरीसुद्धा महापालिका उघड्या गटारांच्या बाबतीत सतर्कता बाळगत नसल्याचे दिसून आले आहे. अजूनही अनेक सखल भागात पावसाचे पाणी साचून आहे. सर्वच गटारे तुडुंब भरून वाहत आहेत. अशावेळी उघडी गटारे मृत्यूचे सापळे बनत आहेत. नालासोपारा पूर्व सेन्ट्रल पार्क रस्ता पूर्ण दोन दिवस पाण्याखाली होता यावेळी रस्त्याच्या दुतर्फा असलेली गटांवर झाकणे नसल्याने नागरिकांनी त्यात काठ्या रोवून नागरिकांची सुरक्षा केली.

# मंदीत वाहन दुरुस्तीचा आर्थिक भुर्दंड

**विरार (दिगंबर जाधव)-** मुसळधार पावसाने अनके इमारतीत पाणी साचून राहिल्याने वाहनांमध्ये पाणी जावून वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. करोना काळात आधीच आर्थिक मंदीचा फाटका सहन करणाऱ्या वाहन धारकांना रस्त्यांवरील पावसामुळे वाहन दुरुस्तीचा आर्थिक भरुदड सहन करावा लागत आहे. आपली वाहने दुरुस्त करण्यासाठी आता पदरमोड करून नागरिक गॅरेज वर रांगा लावत आहेत. शहरामध्ये रविवारी दाखल झालेल्या पावसाने चांगलाच जोर धरत रात्रभर भूफान फलंदाजी केली. यामुळे रविवारी सकाळपर्यंत शहरातील अनेक भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. बहुतांश सकल भागात कमरे एवढे पाणी साचल्याने अनेकांच्या घरात पाणी शिरून सामानांचे नुकसान तर केलेच पण त्याच बरोबर घराबाहेर उभी असलेली वाहने रात्रभर पाण्यात असल्याने वाहनात पाणी जाऊन त्यांच्यात बिघाड निर्माण झाले.



यात बहुतांश चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान झालेचे समोर आले आहे. आधीच करोना काळात आर्थिक तंगीचा नागरिक सामना करत आहेत. त्यात कामावर जाण्यासाठी शासकीय प्रवास यंत्रणा नसल्याने मागील वर्षभरात अनेकांनी आपली खासगी वाहने खरेदी केली. पण रविवारी कोसळलेल्या मुसळधार पावसाने. वाहनांचे मोठे नुकसान केले. शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर खड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. तसेच रस्त्यांवर आणि खड्यात पावसाचे पाणी साचून राहत असल्याने वाहने खड्यात आपटून त्यांचे नुकसान होत आहे. खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अनेक दुचाकी वहानांना अपघाताला सामोरे जावेल लागतआहे. वाहने खराब होत असल्याने अनेकांच्या कामावर दांड्या लागत आहेत. विरार पूर्व येथील जलबाव वाडी परिसरातील अत्तार अपार्टमेंट मध्ये राहणाऱ्या स्नेहल कांबळे यांनी सांगितले की, त्यांच्या दोनही चारचाकी वाहनात इंजनमध्ये पाणी गेल्याने त्यांना जवळ जवळ ४० हजाराहून अधिक खर्च आला आहे.

# उल्हास नदीच्या पुराचा बदलापूर, कल्याणला फटका

**बदलापूर (अकिल शेख):** उल्हास नदीला आलेल्या पुराचा फटका बदलापूर, कल्याण तालुक्यातील गावे आणि कल्याण शहराच्या काही भागाला बसला. गुरुवारी मध्यरात्रीपासूनच उल्हास नदीने धोक्याची पातळी ओलांडली होती. त्यामुळे बदलापूर-कर्जत राज्यमार्ग आणि रेल्वेमार्ग पाण्याखाली गेले होते. पुराच्या पाण्यामुळे बदलापूर, शहाड, कल्याण तालुक्यातील म्हारळ, वरप, कांबा आणि रायते या नदीकाठच्या गावांतील तर कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील शहाड, टिटवाळा येथील शेकडो घरांमध्ये पाणी शिरले. या पुरात विविध ठिकाणी अडकलेल्या शंभरहून अधिक जणांची राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल व अग्नीशमन दलाच्या मदतीने सुटका करण्यात आली. बुधवारी सायंकाळनंतर लोणावळा, खंडाळा, कर्जत आणि नेरळ या भागात झालेल्या जोरदार पावसामुळे गुरुवारी मध्यरात्रीपासूनच उल्हास नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली होती. गुरुवारी



पहाटेच्या सुमारास शहरातील रमेशवाडी, बॅरेज रस्ता, हेंद्रेपाडा, मोहनानंद नगर, शनीनगर, खरवई या भागात पाणी साचण्यास सुरुवात झाली. सायंकाळी अनेक ठिकाणी पावसाचे पाणी ओसरू लागले. कल्याण तालुक्यातील रायते, कांबा, वरप आणि म्हारळ या गावांमध्ये उल्हास नदीच्या पुराचे पाणी शिरले. त्यामुळे अनेक नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले. कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात येणाऱ्या शहाड, मोहने रस्ता, टिटवाळा या भागात अनेक रहिवासी संकुलांमध्ये पुराचे पाणी शिरले. डोंबिवलीतील खाडी किनारच्या भागातही पाणी शिरले होते. वालधुनी नदी किनारच्या कल्याण पूर्वेच्या भागातही अनेक घरांत पाणी शिरले होते. पाण्यात अडकलेल्या शंभरहून अधिक नागरिकांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, अग्निशमन दल आणि स्थानिकांनी वाचवले. उल्हास नदीला पूर आल्याने बदलापूर वांगणीदरम्यानचे रेल्वे रूळ पाण्याखाली गेले होते.

# लशींचा साठा असताना अतिवृष्टीमुळे केंद्रे बंद

**ठाणे (तृप्ती गोरे):** जिल्ह्याला ३१ हजार २४० लशींचा साठा गुरूवारी उपलब्ध झाला असला तरी, हवामान विभागाने पुन्हा अतिवृष्टीचा इशारा दिल्याने ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर पालिकांनी शुक्रवारी लसीकरण केंद्रे बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. भिवंडी शहरात दोन तर, ग्रामीण भागात काही ठिकाणी लसीकरण केंद्रे सुरू राहणार आहेत. लस तुटवड्याअभावी आणि हावामान विभागाने दिलेल्या अतिवृष्टीच्या



इशारामुळे गेल्या तीन ते चार दिवसांपासून जिल्ह्यातील लसीकरण केंद्रे बंद ठेवावी लागली होती. गुरूवारी जिल्ह्याला ३१ हजार २४० लशींचा साठा उपलब्ध झाला आहे. परंतू, मुसळधार पावसामुळे ठाण्यापल्याडच्या शहरांमध्ये पुरस्थिती निर्माण झाली आहे. तसेच हवामान विभागाने पुन्हा अतिवृष्टीचा इशाराही दिला आहे. या पार्श्वभूमी वर ठाणे, कल्याण – डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर पालिकांनी शुक्रवारी लसीकरण केंद्रे बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**

R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# बीडीडी चाळींचा पुनर्विकास ही मुंबईकरांसाठी अनोखी भेट -जितेंद्र आव्हाड

**मुंबई (दिपेश गोरिवले)- साधारणतः १९२० च्या दरम्यान ब्रिटिशांनी या बीडीडी चाळीच्या इमारती बांधल्या. स्वातंत्र्यानंतर जेव्हा लोकल रेल्वे सुरू झाली. त्यानंतर या भागाकडे लोकांचे येणेजाणे वाढले, स्थलांतर झाले. त्या पार्श्वभूमीवर सर जॉर्ज लॉईड यांनी गृहनिर्मिती व विकासाची मोठी योजना तयार करून बीडीडीची उभारणी केली. या जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न जटिल बनला होता.**

फडणवीस सरकारच्या काळात या प्रकल्पाला गती देण्याचा प्रयत्नही झाला; पण प्रकल्प मार्गस्थ होऊ शकला नाही. आम्ही मात्र हे आव्हान पेलू शकलो. हा प्रकल्प अखेर मार्गी लावल्याचा आनंद तर आहेत, पण तो निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या आव्हानाची जाणीवही आहे; पण अवघड काम पूर्ण करण्यातच खरी मजा आहे. या प्रकल्पात अनेक अडचणी होत्या. रहिवाशांमध्ये गैरसमज होते. पोलिसांच्या घरांचा प्रश्न होता. मात्र सर्वांशी चर्चा करून त्यांचे गैरसमज दूर केले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले. त्यातून गरजेनुसार निर्णय घेतले नि हा प्रश्न मार्गी लागला. वरळी, ना.म. जोशी मार्ग – परळ व नायगांव येथील शासनाच्या ३४.०५ हेक्टर जागेवर १९५ चाळी आहेत. प्रत्येक चाळ ही तळ+३ मजल्यांची असून त्यात प्रत्येकी ८० रहिवासी गाळे आहेत. म्हणजेच या प्रकल्पात १५,५९३ गाळे, स्टॉल्स व अधिकृत झोपड्या आहेत. चाळींचा पुनर्विकास करून पात्र गाळेधारकांना ५०० चौरस फूट चटई क्षेत्रफळाची सदनिका विनामूल्य व मालकी हक्काने दिली जाणार आहे. तसेच या ठिकाणच्या झोपडपट्टीधारकांनाही २६९ चौरस फूट क्षेत्रफळाची सदनिका मिळणार आहे. बीडीडी चाळींचा पुनर्विकास या योजनेद्वारे १५ हजार ५९३ पुनर्वसन गाळ्यांव्यतिरिक्त सुमारे ८ हजार १२० विक्रीयोग्य घरे बांधण्यात येणार आहेत. प्रकल्पाचे बांधकाम सुरू असताना काही रहिवाशांना प्रकल्प जागेजवळ असलेल्या संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्यात येणार असून बाकीच्यांना महिना २५ हजार रुपये भाडे देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी २०१० च्या आधीपासून राहणाऱ्या दोन हजार ९०० पोलिसांनाही घरे देण्यात येणार असून १ जानेवारी २०२१ पूर्वी झालेले खरेदी-विक्रीचे व्यवहार ग्राह्य मानून लोकांना घरे दिली जातील. नायगांव व ना. म. जोशी मार्ग येथील पुनर्विकास प्रकल्प येत्या सात वर्षांत, तर वरळी येथील प्रकल्प येत्या आठ वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.



नायगाव येथे ३ हजार ३४४ लोकांचे पुनर्वसन करण्याठी २२ मजली इमारती बांधण्यात येणार असून व विक्रीयोग्य इमारत ६० मजल्यांपर्यंत प्रस्तावित आहे. ना. म. जोशी मार्ग येथे २ हजार ५६० लोकांच्या पुनर्वसनासाठी २२ मजल्यांपर्यंत व विक्रीयोग्य इमारत ४० मजल्यांपर्यंत बांधण्यात येणार. वरळीत ९ हजार ६८९ लोकांसाठी पुनर्वसन इमारत ४० मजल्यांपर्यंत व विक्रीयोग्य इमारत ६६ मजल्यांपर्यंत बांधण्यात येणार आहे.

माझे नेते पवारसाहेबांनी अत्यंत विश्वासाने गृहनिर्माणाची जबाबदारी दिली असून मेहनतीने त्याला न्याय देण्याचा माझा प्रयत्न आहे. सर्वसामान्यांचा 'म्हाडा'शी येणारा संबंध लक्षात घेऊन लोकांची कमीत कमी वेळेत आणि कमीत कमी कागदपत्रांच्या आधारे अपेक्षित कामे मार्गी लावणारी व्यवस्था निर्माण करण्यावर भर दिला आहे.

## शासकीय वापराकरिता इलेक्ट्रीक वाहनांचीच खरेदी बंधनकारक

**मुंबई (सम्यक कासारे)-** बृहन्मुबई, पुणे, नागपूरसह सहा प्रमुख शहरांमध्ये १ एप्रिल २०२२ पासून शासकीय, निम शासकीय, महापालिका किंवा सरकारच्या निधीतून खरेदी करण्यात येणारी व भाडेतत्वावरील वाहने बॅटरीवरील इलेक्ट्रीक वाहने (इव्ही) असावी, असे बंधन सुधारित 'महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरणा'त घालण्यात आले आहे. तर खासगी इलेक्ट्रीक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी निर्मिती, वाहन-बॅटरी खरेदी-विक्री, नोंदणी, मोडीत काढणे अशा विविध टप्प्यांवर सवलती देण्यात येणार आहेत. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पुढील चार वर्षांकरिता ९३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बृहन्मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद आणि नाशिक या सहा शहरांमध्ये प्रामुख्याने हे धोरण लागू राहील.



२०२५ पर्यंत या शहरांमधील नवीन वाहन नोंदणीत १० टक्के हिस्सा बॅटरी इलेक्ट्रीक वाहनांचा असणे, २५ टक्के सार्वजनिक वाहतूक वाहनेही या प्रकारची असणे, 'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळा'च्या ताफ्यातील किमान १५ टक्के वाहने ईव्ही प्रकाराची असणे, या धोरणानुसार बंधनकारक असेल. इलेक्ट्रीक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशनची कमतरता हा अडचणीचा मुद्दा ठरतो. म्हणून या वाहनांच्या चार्जिंगसाठी बृहन्मुंबई (१५००), पुणे (५००), नागपूर (१५०), नाशिक (१००), औरंगाबाद (७५), अमरावती (३०), सोलापूर (२०) येथे येत्या चार वर्षांत स्टेशन उभारण्याचे उद्दिष्ट आहे. सध्या महाराष्ट्रात नोंदणी असलेल्या तीन कोटी वाहनांपैकी केवळ ३८ हजार वाहने इलेक्ट्रीक आहेत. भविष्यात इलेक्ट्रीक वाहनांची खरेदी व वापर वाढवून पर्यावरण संतुलन राखण्यासाठी २०१८च्या सुधारित महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरणाला पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने शुक्र वारी मान्यता दिली. हे धोरण राज्यात विक्री व नोंदणी झालेल्या फक्त बॅटरीद्वारे चालणाऱ्या इलेक्ट्रीक वाहनांना लागू असेल. यात माईल्ड-स्ट्राँग हायब्रीड, प्लग-इन हायब्रीड इलेक्ट्रीक वाहने समाविष्ट नसतील. धोरणाच्या अंमलबजावणीसाठीचा निधी येत्या काळात जुन्या वाहनांच्या नोंदणीसाठी आकारण्यात येणारा हरित कर, जीवाश्वा इंधनावरील उपकर आदीच्या माध्यमातून उपलब्ध केला जाईल.

## मुंबईत लक्झरी घरं खरेदी-विक्रीत वाढ; गेल्या सहा महिन्यात इतक्या कोटींची उलाढाल

**मुंबई (नितीन देवळेकर)-** करोनाचा फैलाव रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या निर्बंधामुळे सर्वच क्षेत्रांना फटका बसला. बांधकामक्षेत्रही यातून सावरू शकलं नाही. मात्र गेल्या काही दिवसात पुन्हा एकदा मालमत्ता खरेदी विक्रीला चालना मिळत असल्याचं दिसत आहे. मुंबईतील लक्झरी प्रॉपर्टी खरेदी-विक्रीत वाढ झाल्याचं दिसून आलं आहे. जानेवारी २०२१ ते जून २०२१ या कालावधीत सर्वाधिक लक्झरी प्रॉपर्टी खरेदी-विक्री झाल्याचं समोर आलं आहे. प्रतिष्ठीत व्यक्ती, उद्योगपती आणि बॉलिवूड कलाकारांनी खरेदी विक्रीत उत्साह दाखवला आहे. जवळपास ४ हजार कोटी रुपयांची उलाढाल गेल्या सहा महिन्यात झाल्याचं समोर आलं आहे. यामुळे पुढच्या सहा महिन्यात आणखी व्यवहार वाढेल असं जाणकारांचं म्हणणं आहे. करोना येण्यापूर्वी दक्षिण आणि मध्य मुंबईत एका अलिशान घराची किंमत १५ कोटींच्या वर होती.



'देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई नेहमीच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जमिनीचे व्यवहार होत असतात. जानेवारी ते जून दरम्यान १.२६ लाख युनिट विक्री झाल्याची नोंद झाली आहे. २०१९ आणि २०२० च्या तुलनेत ही मोठी उलाढाल आहे. मुद्रांक शुल्क कमी झाल्याने आणि शेअर बाजारातील उत्साहामुळे त्याचे परिणाम खरेदी विक्रीवर झाले आहेत.', असं स्क्वेअर यार्डचे बिजनेस हेड आनंद मूर्ती यांनी सांगितलं आहे. आकडेवारीनुसार ४५ टक्के खरेदी केलेल्या घरांची किंमत १५ ते २० कोटींच्या घरात आहे. तर ४० टक्के खरेदी केलेल्या घरांची किंमत २० ते ३० कोटींच्या आसपास आहे. तर १० टक्क्यांहून कमी खरेदी केलेल्या घरांची किंमत ३० ते ५० कोटींजवळआहे. तर ७ टक्के घरांच्या किंमती या ५० कोटींपेक्षा अधिक आहेत. तर एकूण व्यवहारांपैकी ६० टक्के व्यवहार हे लोअर परळ भागातील आहेत.

# मुंबईतील वसाहतींना दरडीचा धोका

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** मुंबईत २९९ ठिकाणी दरडीवर वसाहती असून त्यापैकी ६० वसाहती या धोकादायक परिस्थितीत, तर २० वसाहती अतिधोकादायक परिस्थितीत आहेत. २०१४ मध्ये पुण्यातील माळीण येथे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर पालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने मुंबईत केलेल्या सर्वेक्षणात ही बाब उघड झाली होती. भारतीय भौगोलिक सर्वेक्षण विभागाच्या सहकार्याने केलेल्या सर्वेक्षणात काही शिफारशी करण्यात आल्या होत्या. मात्र अनेक प्राधिकरणांच्या सीमारेषांमुळे या वसाहती अद्याप तशाच धोकादायक अवस्थेत आहेत.

गेल्या आठवड्यात माहुल आणि विक्रोळी येथे दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर मुंबईत दरडींवरील वसाहतींचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशी दुर्घटना होऊ नये म्हणून पालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने दरडी कोसळण्याच्या ठिकाणांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला. भारतीय भौगोलिक सर्वेक्षण



विभागाची (जिओलॉजिकल सव्हे ऑफ इंडिया) मदत घेण्यात आली होती. त्यानुसार संस्थेने २०१८ मध्ये मुंबईतील या ठिकाणांची पाहणी करून पालिकेला २०१९ मध्ये आपला अहवाल सादर केला होता.

या सर्वेक्षणात डोंगर उतारावर वसलेल्या झोपडपट्ट्यांच्या जमिनीची प्रत, जमिनीच्या उताराची मजबुती, संबंधित जमिनीवर असलेल्या दगड-खडकांचे प्रमाण, अशा बाबींचा अभ्यास करण्यात आला होता. शिवाय धोकादायक आढळलेल्या ठिकाणी २००६ ते २०१६ या काळात पडलेल्या पावसाचे प्रमाण, अतिवृष्टी झाल्यानंतर निर्माण झालेली स्थिती यांचा अभ्यासही करण्यात आला. तसेच उपाययोजनाही सुचवण्यात आल्या होत्या. या सर्वेक्षणानुसार मुंबईतील दरडींवरील २० वसाहती अतिधोकादायक आहेत, भांडुप, विक्रोळी पार्क साइट, घाटकोपर, कुर्ला, मुलुंड, जोगेश्वरी आणि चेंबूरसारख्या ठिकाणी डोंगर उतारावर वसलेल्या झोपड्यांना धोका आहे. अतिधोकादायक २० ठिकाणांपैकी सर्वात जास्त ठिकाणे ही घाटकोपरमध्ये आहेत. त्याखालोखाल भांडुप तर उर्वरित ठिकाणे ही शिवडी, अंधेरी पश्चिम, कुर्ला, चेंबूर, घाटकोपर, गोरेगाव, मालाड, मुलुंडमध्ये आहेत.

## कारशेड वादावर तोडगा काढा!



**मुंबई (जसबीरकौर भामरा)- सुमारे २३ हजार कोटी रुपये खर्चाच्या आणि ३३.५ किलोमीटर लांबीच्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ प्रकल्प रखडल्याने मुंबईकरांचे नुकसान होत आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या प्रस्तावित कांजूरमार्ग येथील कारशेडचा वाद या जागेच्या दावेदारांनी आपापसात चर्चा करून सामोपचाराने सोडविण्याचा प्रयत्न करण्याचा सल्ला मुंबई उच्च न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारला दिल्याचे सरकारमधील विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. या प्रकरणावर उच्च न्यायालयात ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात पुढील सुनावणी होणार आहे.**

राज्य आणि केंद्र सरकारच्या भागीदारीतून स्थापन झालेल्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (एमएमआरसीएल)तर्फे जपानच्या 'जायका' या वित्तीय संस्थेच्या अर्थसाह्यातून हा राज्यातील पहिला भुयारी मेट्रो प्रकल्प राबविला जात आहे. प्रकल्प नियोजनानुसार या मेट्रोचा पहिला टप्पा याच वर्षी सुरू होणार होता. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येताच नोव्हेंबर २०१९ मध्ये मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या पहिल्याच निर्णयात मेट्रो-३च्या आरेमधील कारशेडच्या कामाला स्थगिती दिली. अन्य मेट्रो मार्गासाठीही याच ठिकाणी कारशेड उभारणीसाठी नगरविकास विभागाने ४३ हेक्टर जागेवरील परवडणाऱ्या घरांचे आरक्षण बदलून तेथे मेट्रो कारशेडचे आरक्षण टाकण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार या ठिकाणी मेट्रो टर्मिनल उभारण्याची तयारीही एमएमआरडीएने सुरू केली होती. केंद्र सरकारने मात्र या जागेवर मालकी हक्क सांगत राज्य सरकारविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली. ही जागा मिठागर आयुक्तांच्या अखत्यारीत येते आणि राज्य सरकारला ती कधीही देण्यात आली नव्हती. म्हणूच मुंबई उपजिल्हाधिकाऱ्यांचा 'एमएमआरडीए'कडे या जागेचे हस्तांतरण करण्याचा निर्णय रद्द करण्याची करीत उप मिठागर आयुक्तांमार्फत केंद्र सरकारने ही याचिका केली. जागेच्या मालकीवरून केंद्र आणि राज्य यांच्यात वाद सुरू असतानाच महेश गरोडिया यांनी ही जागा आपल्या मालकीची असल्याचा दावा करीत उच्च न्यायालयात धाव घेतली.

## शाळांच्या शुल्काबाबत राजस्थानमधील निर्णय विचारात घ्यावा

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** शुल्कावरून सुरू असलेल्या शाळा आणि पालकांच्या वादात पालकांना काहिसा दिलासा मिळाला आहे. शुल्काबाबत पालकांच्या तक्रारींवर तोडगा काढण्याची सूचना सर्वोच्च न्यायालयाने शिक्षण विभागाला दिली



असून त्यासाठी राजस्थानमधील शाळांचे १५ टक्के शुल्क कमी करण्याचा निर्णय विचारात घ्यावा, असेही न्यायालयाने सांगितले आहे. करोना कालावधीत अनेक पालक आर्थिक अडचणींना तोंड देत आहेत त्याचा विचार करून शाळांनी शुल्क कपात करावी, वापरात नसलेल्या सुविधांचे शुल्क आकारण्यात येऊ नये, पालकांनी शुल्कावर आक्षेप घेतले असले तरी विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवू नये अशा मागण्या पालक सातत्याने करत आहेत. बहुतेक शाळांनी पालकांच्या मागण्या मान्य केल्याच नाहीत उलट शुल्कवाढ केली. शुल्कवाढ करण्यास मनाई करण्याची पालकांची मागणी उच्च न्यायालयाने मान्य केली नाही. या पार्श्वभूमीवर पालकांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने पालकांना काहिसा दिलासा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने राजस्थानमधील शाळांच्या १५ टक्के शुल्क कपातीचा निर्णय विचारात घेऊन शासनाने पालकांच्या तक्रारीवर तोडगा काढावा अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे. पालकांनी त्यांच्या मागण्यांबाबत अर्ज केल्यानंतर ३ आठवड्यात शासनाला निर्णय घेणे बंधनकारक आहे.

## अभियंत्यांच्या बढतीचा वाद चिघळणार?

**मुंबई (विशाल कारंडे)-** मुंबई महापालिकेतील १३२ अभियंत्यांना बढती देण्याबाबतच्या प्रस्तावाला नुकतीच स्थापत्य समितीमध्ये मंजुरी देण्यात आली. मात्र सदस्यांना अंधारात ठेवून घाईघाईने सत्ताधारी पक्षाने याबाबतचा प्रस्ताव मंजूर केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या अभियंत्याच्या बढतीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचा आरोपही काँग्रेसने केला आहे. येत्या सोमवारी याबाबतचा प्रस्ताव सभागृहात येणार असून त्यावरून वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे.

महापालिकेतील १३२ अभियंत्यांना बढती देण्याबाबतचा प्रस्ताव नुकताच स्थापत्य समितीच्या पटलावर मांडण्यात आला होता. मात्र हा प्रस्ताव सभेच्या तीन दिवस आधी न पाठवता सभेच्या आदल्या दिवशी संध्याकाळी हा प्रस्ताव सदस्यांच्या घरी पाठवण्यात आला. तसेच दृक्-श्राव्य माध्यमातून झालेल्या बैठकीत कोणत्याही चर्चेविना हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला, असा आरोप विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी केला आहे. १३२ अभियंत्यांपैकी १०५ साहाय्यक अभियंत्यांना कार्यकारी अभियंतापदी बढती देण्यात आली



आहे, तर २७ कार्यकारी अभियंत्यांना उपप्रमुख अभियंतापदी बढती देण्यात आली आहे. अभियंत्यांना बढती देण्यास आमचा विरोध नाही, पण ज्या पद्धतीने हे प्रस्ताव मंजूर करण्यात आले त्याचा आमचा विरोध असल्याची प्रतिक्रिया रवी राजा यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, स्थापत्य समितीमध्ये काँग्रेसचे नगरसेवक सुफियान वणू हे सदस्य असून आपल्याला दृक्-श्राव्य माध्यमातून झालेल्या बैठकीची लिंक उशिरा देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. बैठक सुरू झाल्यानंतर तासाभराने लिंक मिळाली व तोपर्यंत विषय मंजूर करण्यात आला होता, असाही आरोप वणू यांनी केला आहे. त्यामुळे हे विषय पुन्हा स्थापत्य समितीच्या पटलावर चर्चेसाठी आणावे, अशी मागणी वणू यांनी पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांना केली आहे.

ज्या १३२ अभियंत्यांना बढती देण्यात आली आहे त्यांची नावे प्रस्तावात असली तरी त्यापैकी कोणावर गुन्हे आहेत का, कोणते भ्रष्टाचाराचे आरोप आहेत का याबाबत कोणतीही माहिती प्रस्तावात दिलेली नाही, असे काँग्रेसचे म्हणणे आहे. तसेच काही अभियंत्यांना डावलून ही बढती देण्यात आल्याचा आरोप अभियंते करीत आहेत.

## घरोघरी लसीकरणापूर्वी यादीतील व्यक्तींची पडताळणी

**मुंबई (नितीन देवळेकर)-** अंथरुणाला खिळलेल्या किंवा आजारपणातून घराबाहेर पडू न शकणाऱ्या सुमारे चार हजार व्यक्तींची यादी लसीकरणासाठी पालिकेकडे आली असून या व्यक्तींची पडताळणी केल्यावरच घरी जाऊन त्यांचे लसीकरण केले जाणार आहे. घरोघरी लसीकरण करण्याबाबत केंद्रापासून ते अगदी राज्यांपर्यंत अनेक महिने प्रलंबित असलेला निर्णय अखेर मुंबईपासून मार्गी लागणार आहे. १ ऑगस्टपासून या व्यक्तींचे लसीकरण मुंबईत सुरू करण्यात येणार आहे. या व्यक्तींच्या लसीकरणाचे नियोजन करण्याची तयारी पालिकेने सुरू केली असून पालिकेच्या प्रत्येक विभागामधून आलेल्या माहितीनुसार सुमारे चार हजार नागरिकांची यादी आलेली आहे. परंतु यात खरेच किती



जणांना घराबाहेर पडणे शक्य होणार नाही याची पडताळणी केली जाणार आहे. यासाठी विभागीय नियंत्रण कक्षाची मदत घेतली जाईल. विभाग स्तरावरही प्रत्यक्ष त्या व्यक्तीची माहिती घेतली जाईल, असे पालिकेच्या कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. मंगला गोमारे यांनी सांगितले.

आलेल्या यादीमध्ये अस्थिभंग झाल्याने प्लास्टर केलेल्या व्यक्तींनेही घरी लसीकरणासाठी येण्यासाठी नाव नोंदविल्याचे आढळले आहे. अशा व्यक्तींना आता नाही, परंतु काही दिवसांनी येऊन लस घेणे शक्य आहे. घरोघरी जाऊन लसीकरण करण्याची प्रक्रिया मोठी आहे. घरोघरी लसीकरणासाठी खास गाडी, लस देण्यासाठी आणि दुष्परिणाम झाले तर तातडीने उपचार देण्यासाठी डॉक्टरांपासून आरोग्य कर्मचारी पाठविले जाणार आहेत. शिवाय लस दिल्यानंतर किमान अर्धा तास तिथे थांबणे अपेक्षित आहे. तेव्हा एका व्यक्तीसाठी स्वतंत्रपणे ही सुविधा उपलब्ध केल्यानंतर तिचा योग्य वापर होणे गरजेचे आहे. त्यामुळे घरोघरी लसीकरण कोणाचे केले जावे याचे निकषही लवकरच जाहीर केले जातील, अशी माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

यादीमध्ये अशा काही व्यक्ती आढळल्यास ज्यांना खूप अंतर नाही पण अगदी घराजवळच्या केंद्रामध्ये जाऊन लस घेणे शक्य आहे.

## जलयुक्त शिवारची ११७३ कामे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे

**मुंबई (सम्यक कासारे)-** तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी जलयुक्त शिवार योजनेतील ११७३ कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे उघडकीस आल्यानंतर ही सर्व प्रकरणे गुरुवारी चौकशीसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोपविण्यात आली. तसेच अन्य कामांची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याचेही आदेश जलसंधारण विभागाने दिले आहेत जलयुक्त शिवार योजनेतून राज्यभरात २२,५८९ गावांमध्ये ६,४१,५६० कामे करण्यात आली. तसेच या योजनेवर सुमारे ९,७०० कोटी रुपये खर्च झाले. भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांनी



या योजनेतील अनेक कामामध्ये अनियमितता झाल्याचे ताशेरे ओढल्यानंतर राज्य सरकारने विशेष समितीच्या माध्यमातून केलेल्या चौकशीतही या योजनेच्या कामामध्ये अनियमितता आढळून आली आहे. या समितीकडे कॅगने आक्षेप नोंदविलेली ११२८ तसेच सरकारकडे आलेल्या ६७१ तक्रारी सोपविण्यात आल्या होत्या. त्याची शहानिशा करून समितीने कॅगने आक्षेप घेतलेल्या कामांपैकी ९२४ आणि सरकारकडे आलेल्या तक्रारींमधील २४९ अशा ११७३ प्रकरणांची खुल्या चौकशीसाठी शिफारस केली होती. त्यानुसार ही सर्व प्रकरणे खुल्या चौकशीसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोपविण्यात आली आहेत.

## पहिली ते बारावीचा अभ्यासक्रम यंदाही कमी

**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्य मंडळाचा पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांवर यंदाही अभ्यासाचा भार कमी राहणार आहे. गेल्यावर्षी अभ्यासक्रमात केलेली कपात शिक्षण विभागाने कायम ठेवली आहे. करोनाच्या प्रादुर्भावामुळे ऑनलाईन वर्ग भरत असल्याने अभ्यासक्रम कमी करण्याची मागणी पालक, शिक्षकांनी गेल्यावर्षी केली. त्यानुसार पहिली ते बारावीचा २५ टक्के अभ्यासक्रम कमी करण्यात आला. यंदा कमी केलेला अभ्यासक्रम राहणार की पूर्वीप्रमाणेच सर्व अभ्यासक्रम असणार याबाबत संभ्रम निर्माण झाला होता.

# नियती - फीड दी निड , केअर फाउंडेशन चा अजून एक उपक्रम



**मुंबई (विशाल कारंडे)-** २०११ सालापासून उत्कृष्ट रित्या कार्यरत असलेली खार पूर्व स्थित स्वयं सेवी संस्था केअर फाउंडेशन विविध प्रकारचे उपक्रम राबवित असते. अशाच त्यांच्या सामाजिक कार्यामध्ये अजून एक उपक्रमाची भर पडली आहे. नियती - फीड दी निड, या केअर च्या नव्या उपक्रमात त्यांनी रस्त्याच्या कडेला वास्तव्य करीत जेवण कपड्यासाठी संघर्ष करणाऱ्या परिवारांना जेवण व कपड्याची मदद करण्याचे योजिले आहे. याची सुरुवात म्हणून केअरच्या टीम ने जवळपास ७५ परिवारांना रेशन सामग्री देण्यास सुरुवात केली आहे. केअरच्या युवा समूहाने दि. २० जुलाई २०२१ रोजी हा उवक्रम तिसऱ्यांदा राबविला. या उपक्रमाला मोठ्या प्रमाणावर व बदल घडविण्याच्या उद्देशाने पुढे राबविण्यात येणार असे संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्री. अनिकेत घनश्याम भंकाळ यांचे कथन आहे. हा उपक्रम त्यांच्या भंकाळ परिवारात जन्मलेल्या चिमुकल्या बाळाच्या नावाने राबविण्यात आला होता. यातून त्यांनी सर्वांना असा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे की आपल्या सुखात अनेकांना शामिल करून पाहा, ही दुनिया किती सुखमय होते ते. या वर्षी केअर फाउंडेशन ला दशक पूर्ण होणार असून आता त्यांना ८०३ चे रजिस्ट्रेशन देखील मिळाले आहे. संस्थेच्या सचिव श्रीमती भावना नरेंद्र जैन यांनी केअर फाउंडेशन अजून काही समाज कल्याणयुक्त उपक्रम येत्या काही महिन्यात घेऊन येणार असल्याचे सांगितले. नियती उपक्रमाला संस्थेतील मेंबर्स कु.रोहित जैसवाल, कु. ऋषिकेश बनसोडे, कु. साहिल जैसवाल, अर्षद, अजिंक्य जोशी, आकाश गुप्ता, अक्षय दर्जी व करण गुप्ता यांनि अतिशय मोलाचा सहयोग दिला.



## कोकणी माणूस तुम्हाला तुमची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही - शालिनी ठाकरे

**चिपळूण (अमोल गुडेकर)-** अतिवृष्टीमुळे पुर आणि दरड कोसळल्यामुळे चिपळूण (म्प्ज्त्ल्ह) शहर उध्वस्त झाले आहे. मोठ्या प्रमाणात जीवीतहानी आणि आर्थिक नुकसान झाले आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल चिपळूणचा पाहणी दौरा केला. या दौऱ्यात शिवसेनेचे स्थानिक आमदार भास्कर जाधवही सहभागी झाले होते. पुरग्रस्तांशी संवाद साधत असताना एका महिलेने मुख्यमंत्र्याकडे आपली व्यथा मांडत मदत मागितली. "पुराचे पाणी माझ्या घराच्या छतापर्यंत पोहोचले. त्यात सर्वकाही वाहून गेले. तुम्ही काहीही करा, आमदार - खासदारांचे दोन महीन्यांचे पगार रद्द करा, पण आम्हाला मदत करा. मदत केल्याशिवाय जाऊ नका हो" असा हंबरडा फोडत त्या महीलेने मुख्यमंत्र्याकडे मदत मागितली. मुख्यमंत्री शातपणे ऐकत होते आणि त्यांनी मदतीचे आश्वासनही दिले. मात्र अचानक आमदार भास्कर जाधव हे त्या महिलेला म्हणाले की, 'आमदार खासदारांनी सहा महिन्याचा पगार दिला तरी काय होणार नाय, तुझा मुलगा कुठंय? तुझ्या आईला समजव. उद्या भेट,' अशी प्रतिक्रिया दिली. हा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. विरोधकांनी सरकार खासकरुन शिवसेनेला धारेवर धरलं आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सरचिटणीस शालिनी ठाकरे देखील भास्कर जाधवांवर कडाडून टीका केली आहे. 'भास्कर जाधव, आज त्या अगतिक महिलेवर जो हात उघारलाय ना? तोच हात पुढच्या पाच वर्षांनी जोडून जेव्हा मतं मागायला याल, तेव्हा हाच कोकणी माणूस तुम्हाला तुमची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही,' असा इशारा त्यांनी भास्कर जाधवांना दिला.



## आदिवासी बांधवांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन स्वत:सह समाजाची प्रगती साधावी – बाळासाहेब थोरात

**शिर्डी (सम्यक कासारे)-** तालुक्यातील प्रत्येक माणसाच्या व कुटुंबाच्या विकासासाठी संगमनेर तालुक्यात सातत्याने काम होत असून यशोधन कार्यालयामार्फत यासाठी पाठपुरावा केला जात आहे. आदिवासी व गोरगरीब माणसांसाठी शासनाच्या विविध योजना असून त्याचा लाभ घेऊन या बांधवांनी स्वत:ची, कुटुंबाची व समाजाची प्रगती साधावी, असे आवाहन महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले असून सरकारच्या माध्यमातून आपण सातत्याने गोरगरिबांच्या विकासासाठी काम करत असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना येथे आदिवासी विकास विभागाच्यावतीने अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थ्यांना खावटी योजना २०२०-२१ अंतर्गत अन्नधान्य व किराणा किट वितरणप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी बोलताना महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना दिली. यामुळे सर्वांना समतेचा अधिकार मिळाला आहे.



## कोल्हापूरमध्ये आता नवे संकट! पुणे महापालिकेची मदतीसाठी धाव

**पुणे (अभिजीत येरल्लू)-** अतिवृष्टीनंतर कोकण व पश्चिम महाराष्ट्रात आलेल्या पुराचे पाणी ओसरले असले तरी आता नवनवी संकटे समोर येत आहेत. कोल्हापूरमधील जलशुद्धीकरणाचे काही प्लाण्ट बंद पडल्यामुळं आता पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

पश्चिम महाराष्ट्रात सध्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. पुण्याबरोबरच सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी आणि कोकण या शहरांत अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झालेले आहे. पुराचे पाणी शहरात शिरल्याने कोल्हापूरमधील जलशुद्धीकरणाचे काही प्लाण्ट बंद पडले आहेत. पंपिंग स्टेशनमध्ये पाणी घुसून साचल्याने पम्पिंग यंत्रणा बंद पडली आहे. नागरिकांना पिण्याचे पाणी पोहोचवणे कठीण झाले आहे. त्यात कोल्हापूर महानगरपालिकेकडे टँकरची संख्या अपुरी आहे. त्यामुळे अडचणीत भर पडली आहे. ही अडचण लक्षात घेऊन कोल्हापूर महापालिका आयुक्तांनी पुणे म्हणगरपालिकेकडे टँकरची मदत व्हावी, अशी विनंती केली होती. पुणे महापालिकेने या विनंतीस तात्काळ प्रतिसाद दिला आहे. कोल्हापूर महापालिकेच्या विनंतीवरून प्रभारी आयुक्तांच्या सूचनेनुसार, पाणीपुरवठा विभागाचे १७ मोकळे टँकर काल कोल्हापूरला रवाना करण्यात आले. टँकर्स बरोबर सुपरवायझर, इलेक्ट्रिशियन असे एकूण २१ जण आज सकाळी कोल्हापूरला सुखरूप पोहोचले. हा चमू साधारण एक आठवडा कोल्हापूरमध्ये राहील अशी शक्यता आहे. या कालावधीसाठी सगळ्यांच्या निवासाची तसेच जेवणाची संपूर्ण सोय कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.



## भास्कर जाधवांच्या दमदाटीवर शिवसेनेतून पहिलं भाष्य, रोखठोक बोलणारे संजय राऊत म्हणतात

**मुंबई (नितीन देवळेकर)-** शिवसेना नेते भास्कर जाधव यांच्या चिपळूणमधील दमदाटीवर शिवसेनेतून पहिली प्रतिक्रिया आली आहे. प्रत्येक घडामोडींवर रोखठोक भाष्य करणारे शिवसेना खासदार संजय राऊत यांनी याप्रकरणात मात्र संयमी प्रतिक्रिया दिली. 'भास्कर जाधवांबाबत मी पाहिलं नाही, वृत्तपत्रांमध्ये वाचलं. त्यामुळे त्या सगळ्यावर तेच बोलतील. पण या अशा सगळ्या परिस्थितीमध्ये संयम ठेवणे गरजेचे आहे. लोकांचा आक्रोश वेदना समजून घेणे महत्त्वाचे आहे आणि मुख्यमंत्री आणि सरकार हे करते आहे', असं संजय राऊत म्हणाले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल पावसाने उद्धवस्त झालेल्या चिपळूणमधील बाजारपेठेची पाहणी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांना नुकसान भरपाईची विनवणी करणाऱ्या एका महिलेला भास्कर जाधवांनी दमदाटी केल्याचा आरोप आहे. त्यावर संजय राऊत यांनी भास्कर जाधवच याबाबत भाष्य करतील असं सांगितलं. महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांमध्ये पूरग्रस्त परिस्थिती आहे. लाखो लोक बेघर झालेले आहेत, मोठे नुकसान झाले. अनेकांचे जीव गेले आणि त्यांचे कुटुंब उद्धवस्त झालेत त्या सगळ्यांना आता सावरायचं आहे. महाराष्ट्र सरकारचा पूर्ण प्रयत्न करत आहे, पण केंद्र सरकारनेसुद्धा जास्तीत जास्त मदत महाराष्ट्राला करावी लागेल, असं संजय राऊत म्हणाले. तसेच मुंबई शहरात अनेक धनिक लोक आहेत, त्यांनीसुद्धा जास्त लक्ष महाराष्ट्राकडे द्यावे. महाड, सातारा, सांगली, कोल्हापूर येथे गावं उद्धवस्त झाली आहेत. त्या गावांना आता पुन्हा एकदा उभं करावं लागेल. सरकार आपल्याकडून पूर्ण प्रयत्न करत आहे, असा दावा संजय राऊत यांनी केला.



## वाशीतील प्रसिद्ध पबवर पालिकेची धडक कारवाई, ५० हजारांच्या दंडाची आकारणी

**नवी मुंबई (विशाल कारंडे)-** कोविडमुळे आस्थापनांना निर्बंध लागू असतानाही विनापरवाना सुरू असलेल्या पबवर नवी मुंबई महापालिकेने कारवाई केली आहे. वाशी सेक्टर ३० या ठिकाणीही हा पब रात्री उशिरापर्यंत सुरू होता. याची माहिती मिळताच, पालिकेच्या पथकाने त्या ठिकाणी छापा टाकून ५० हजारांचा दंड आकारला आहे. कोरोनामळे शहरातील सर्वच आस्थापनांना नियम लागू करण्यात आले आहेत. त्यात अत्यावश्यक सेवा वगळता इतर हॉटेल व्यावसायिकांना ग्राहकांची मर्यादा घालण्यात आली आहे. दरम्यान, शहरात या बेकायदेशीरपणे चालणारे हुक्का पार्लर, पब यांच्याकडून मात्र उघडपणे कायदा हाती घेतला जात असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्याकडून रात्रीच्या वेळी आस्थापना सुरु ठेवून ग्राहकांची गर्दी जमवली जात आहे. अशाप्रकारे वाशी सेक्टर ३० ए येथील हाऊस ऑफ लॉईस हा पब रात्री उशिरापर्यंत सुरू होता. याची माहिती महापालिकेच्या पथकाला मिळाली असता त्यांनी रात्री ११ च्या सुमारास त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी पबमध्ये गर्दी असल्याचे आढळून आले. त्यानुसार, पालिकेने पब चालकाला ५० हजारांचा दंड आकारला आहे. वाशीत गेल्या १० जुलैपासून मागील पंधरवड्यात ३१ विशेष दक्षता पथकांनी तसेच ८ विभाग कार्यालय स्तरावरील दक्षता पथकांनी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. यानुसार २४४२ व्यक्ती/दुकानदार यांच्यावर मास्क, सुरक्षित अंतर, थुंकणे त्याचप्रमाणे ४ वा. नंतर दुकाने / आस्थापना सुरू ठेवणे अशा प्रकारची प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. यानुसार २२ लाख ८८ हजार ३०० इतकी दंडात्मक रक्कम वसूल केली गेली आहे.



## सीएम बीएम गेला उडत, आम्हाला नावं नका सांगू कुणाची? राणे जिल्हाधिकाऱ्यावर संतापले

**रत्नागिरी (योगेश होळंब)-** चिपळूण दौऱ्यात अधिकारी उपस्थित नसल्यानं भाजप नेत्यांनी संताप व्यक्त केला. व्यापाऱ्यांनी तक्रारीचा पाढा वाचल्यानंतर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन करुन त्यांची शाळाच घेतली. मात्र, यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा उल्लेख करताना राणेंचा तोल गेल्याचंही दिसलं. राणेंचा जिल्हाधिकाऱ्यांसोबत बोलतानाचा हा व्हिडीओ सध्या राज्यात चर्चेचा विषय ठरत आहे. नारायण राणे जिल्हाधिकाऱ्यांना म्हणाले, 'तो सीएम बीएम गेला उडत. आम्हाला कुणाचीही नावं सांगू नका. प्रांत सांगतो पालकमंत्र्यांसोबत आहे, तुम्ही सांगताय सीएमसोबत आहे. इथं कोण आहे? इथं तुमचा एक तरी अधिकारी आहे का? आतापर्यंत तुम्हाला स्वस्थ बसू दिलं, आता जागेवर बसू देणार नाही हे लक्षात ठेवा.' समोर जिल्हाधिकाऱ्यांनी सीईओ संबंधित ठिकाणी असल्याचं सांगितलं. त्यानंतर कोण सीईओ आहे, मला कुणीही भेटलं नाही असं सांगितलं. मी बाजारपेठेत उभा आहे. कोण आहेत सीईओ? मला दाखवा, असंही नारायण राणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सुनावलं.

नारायण राणे यांनी आपल्या दौऱ्या दरम्यान अधिकारी उपस्थित नसल्यानं जिल्हाधिकाऱ्यांना फैलावर घेतलं. मात्र, असं करत असताना त्यांनी मुख्यमंत्र्यांचाही अनादर केला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर बोलत असताना त्यांनी एकेरी भाषेचा उपयोग करत तो सीएम बीएम गेला उडत असं उद्दाम भाष्य केलं. त्यामुळे यावरुन राणेंवर टीकाही होत आहे. मुख्यमंत्री चौथ्या दिवशी कोकणात का आले ते सांगतो. काल साडे सहाला माझा फॅक्स आला. मी कोकणात येत असल्याचं कळवलं होतं.



## हरवले आहेत



**नावः विलास सूर्यकांत पाटील**
**वयः (६१ वर्ष)**

**निर्मल नगर येथून ९-७-२०२१ रोजी घरातून बाहेर निघाले असता घरी आलेले नाहीत. त्यांची हरवल्याची नोंद निर्मल नगर पोलिस स्टेशन येथे आहे. निळ्या रंगाचे टी-शर्ट आणि हाफ पँट.**

संपर्क

वर्षा घोगरे- (०२२) २६४७९३७२/ ९५६१४०५१७१ पोलीस उपनिरीक्षक, निर्मल नगर पोलीस ठाणे, खार मुंबई

**नावः संगीता सुंदर सोनार**
**वयः (३७ वर्ष)**



**सदर महिला कोणालाही कारण न सांगता दिनांक १३-०७-२०२१ रोजी १५.३० वाजताचे सुमारास गेली आहे. अद्याप पर्यंत परत आलेली नाही. लाल रंगाची मॅक्सी , पायात काळा दोरा, डाव्या हाताच्या पहिल्या बोटावर इंग्रजी अक्षर S असे लिहलेले आहे. याची नोंद खेरवाडी पोलीस ठाणे मुंबई येथे आहे.**

संपर्क :

विशाल पालंडे, ८७७९३९१४६८ उप निरीक्षक, खेरवाडी पोलीस ठाणे.

## बेवारस मृतदेह



बेवारस मयत इसमः मिना बाजार शॉपिंगच्या बाजूला, कुमार टेलर्स, शॉपर्स समोर, बाबासाहेब आंबेडकर गार्डनच्या समोर, बांद्रा पूर्व या ठिकाणी हा रुग्ण बेशुद्ध मिळाला.

**दि.०६/०७/२०२१ रोजी सदर इसमाचा मृत्यु कॉझ ऑफ डेथ सर्टिफिकेट मृत्यूचे कारण Cirrhosis of liver with coronery artery, dieses (natural) असे नमूद करण्यात आले आहे. वरील वर्णनाची व्यक्तीस कोणी ओळखत असल्यास खेरवाडी पोलीस स्टेशन येथे संपर्क करा.**

संपर्क :

विशाल पालंडे, ८७७९३९१४६८ उप निरीक्षक, खेरवाडी पोलीस ठाणे.

## अंधेरीत वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश, दोघींची सुटका, तिघांना अटक

**मुंबई (सम्यक कासारे)-** मुंबईतील अंधेरी एमआयडीसी परिसरात सुरु असलेल्या सेक्स रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला. दोन पीडित मुलींची सुटका करण्यात मुंबई पोलिसांच्या समाज सेवा शाखेला यश आले आहे. या मुलींना वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडून त्यातून मिळणाऱ्या पैशांचा स्वत:साठी वापर करणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे.

संदीप कुमार सिन्हा, (दलाल) विकास उर्फ मनोज यादव, सिकंदर उर्फ जुगल सिंग अशी या अटक आरोपींची नावे आहेत. या प्रकरणातील दोन आरोपी सध्या फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. अंधेरी एमआयडीसी परिसरात आरोपी सेक्स रॅकेट चालवून मुलींना वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडत असल्याचा आरोप आहे. यातून दोन पीडित मुलींची सुटका करण्यात आली आहे.

दुसरीकडे, नालासोपाऱ्यात चाळीतील खोलीत चालणाऱ्या सेक्स रॅकेटचा पर्दाफाश करण्यात नुकतंच पोलिसांना यश आलं आहे. खोलीत तरुणींना डांबून ठेवून, त्यांना जबरदस्ती वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडलं जात असल्याचा आरोप आहे. नालासोपाऱ्यातील वालीव पोलिसांनी या सेक्स रॅकेटचा भांडाफोड केला. नालासोपारा पूर्व पेल्हार गावातील खान कम्पाउंडमध्ये संबंधित महिला हे सेक्स रॅकेट चालवत होती. ती भाभी नावाने परिचित होती. वालीव पोलिसांनी छापा मारुन या सेक्स रॅकेटचा भांडाफोड केला आहे. यातील चार पीडित मुलींची सुटका करण्यात आली, तर दोन आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. अटकेतील आरोपींमध्ये एका तृतीयपंथीयाचा, तर एका महिलेचा समावेश आहे. वसुंधरा संजय तिवारी (वय ४८) आणि अंजली राजकुमार यादव (वय ४५) असे अटक आरोपींची नाव असून वसुंधरा तिवारी ही तृतीयपंथी आहे. या आरोपींकडून २ लाख ५३ हजार ४४० रुपये किमतीचे निरोध (कंडोम्स) असलेले २२ मोठे बॉक्स, रोख रक्कम आणि मोबाईल ही जप्त केले आहेत.



## महिला दक्षता समिती, चिंचवड व स्वायत्त महीला प्रतिष्ठान मिळून गुरूपौर्णिमा साजरी

**पुणे (प्रतिनिधी):** दि.२४ जुलै २०२१ रोजी सर्व महिला दक्षता समिती सदस्या चिंचवड पोलिस स्टेशन आणि स्वायत्त महीला प्रतिष्ठान संस्थेचे सदस्य मिळून सामाजिक आणि पोलिस प्रशासन क्षेत्रात वारंवार लाभणारे सहकार्य सर्वांचे गुरूसमान व्यक्तिमत्व आदरणीय पिंपरी-चिंचवड चे पोलिस आयुक्त श्री.कृष्णप्रकाश साहेब आणि पिंपरी-चिंचवड परिमंडळ १ चे माननीय पोलिस उपायुक्त श्री. मंचक इप्पर साहेब यांना भेटून गुरू पौर्णिमा निमीत्त औक्षण करून शुभेच्छा देण्यात दिल्या. या प्रसंगी सौ. निर्मला जगताप , एड. पुनम राऊत, सौ. क्षमा धाडगे ,सौ. विद्या जोशी, सौ. संजीवनी निकम ह्या आदी भगिनी उपस्थित होत्या. सतत राबवित असलेल्या उपक्रमाचे आदरणीय साहेबांनी कौतुक केले तसेच समाजातील इतर महीला भगिनीसाठीचे कार्य अविरतपणे सुरू ठेवावे असे प्रकारचे मार्गदर्शन केले. त्यामुळे महिला दक्षता समिती, चिंचवड व स्वायत्त महीला प्रतिष्ठान सर्व भराउन गेले. सर्वांनी गुरूपौर्णिमा साजरी करत मनमुराद आनंद लुटला.



